अस्सल सोलापुरी


सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १७ मे २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २२७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## धाराशिवमध्ये दोन कारची समोरासमोर धडक, १० जण जखमी



✔ **धाराशिव** : धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील तुळजापूर-शिर्डी राज्य मार्गावर भीषण अपघात घडला. भूम ते पाथरूड दरम्यानच्या रस्त्यावर वरुड-बावी गावाजवळ शुक्रवारी साडेचार वाजताच्या सुमारास दोन कारची समोरासमोर धडक झाली. या घटनेत १० जण गंभीर जखमी झाले. यातील दोन जण गंभीर तर, आठ जण किरकोळ जखमी झाले. तुळजापूर येथून पुण्याकडे आपल्या कुटुंबासह नऊ जण प्रवास करत होते. यावेळी पात्रुडकडून एक कार भूमकडे जात होती. दरम्यान, बावी-वरुड गावाजवळ या दोन्ही वाहनांमध्ये जोरदार धडक झाली. एक कार रस्त्यावरच आडवी पडली तर दुसरी रस्त्याच्या खाली जाऊन झाडाला धडकली. यावेळी दोन्हीही कारच्या ईअर बॅगमुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र, दोन्ही गाड्यातील आठ ते दहा जण जखमी झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

# पालकमंत्री भडकले, सरकारी बाबू लटपटले

- काही वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार
- प्रश्नांच्या सरबत्तीने डीपीसीची बैठक ठरली वादळी



✔ सोलापूर/प्रतिनिधी

**डीपीसी बैठक**

सोलापूर जिल्हा नियोजन समिती अर्थात डीपीसीची बैठक अपेक्षेप्रमाणे वादळी ठरली. सरकारच्या अनेक विभागांमध्ये बेदिली असल्याचे लक्षात आल्यानंतर समितीचे अध्यक्ष तथा पालकमंत्री जयकुमार गोरे हे जाम भडकले. एकेकाला तंबीच दिली.काही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे फर्मान त्यांनी जेव्हा सोडले तेव्हा सरकारी बाबू भर सभेतच लटपटले.त्यांच्या आदेशामुळे काही अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असणार आहे.कुणाकुणावर गदा येणार हे येत्या काळात दिसून येईल.

शुक्रवारी जिल्हा नियोजन भवन येथे गोरे यांच्या अध्यक्षतेखाली डीपीसीची बैठक पार पडली. त्यावेळी अनेक लोकप्रतिनिधींनी काही अधिकाऱ्यांच्या विरोधात थेट तक्रारी केल्यानंतर गोरे यांनी एकेकाचा पंचनामाच केला. शेतकरी हा देशाचा केंद्र बिंदू आहे. शेतकऱ्यांनी उत्पादन केलेला शेती माल छोट्या वाहनातून विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना शेतकरी, माल वाहतूक वाहन व वाहन मालकांवर कारवाई कराल तर आरटीओच्या त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल,असे गोरे यांनी म्हणाले.

नियोजन समितीच्या झालेल्या बैठकीत सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील पाणी मागणी, पीक विम्याची नुकसान भरपाई, आरोग्य विभाग, पशु संवर्धन, उजनी विकास प्रकल्प, गौण खनिज, घरकुल, वाळू वाहतूक, रस्ते, वीज व इतर प्रश्न याबद्दल उपस्थित आमदारांनी प्रश्नांचा भडिमार करत आपले उत्तर शोधून काढले. गोरे यांनी सकारात्मक उत्तर देत सर्वांना शांत करत सर्वांच्या मागणीला काही शासनस्तरावर तर काही स्थानिक प्रशासनावर आधारित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. शेती व पाणी अंत्यत महत्वाचा प्रश्न असून दिरंगाई करणारे अधिकारी, ठेकेदार व संबंधित विभाग प्रमुखावर कारवाईचे आदेश गोरे यांनी दिले. सोलापूर महानगरपालिकेच्या समांतर जल वाहिनेच्या काम करणारे अधिकारी अन ठेकेदार व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखावर कारवाई करा असा आदेश त्यांनी दिला. जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यावर कारवाई केली जाणारच आहे. महावितरणची डीपी बसविण्यासाठी वायरमन शेतकऱ्यांना पैसे मागतात अशा वायरमनवर कारवाई करा असा आदेश अभियंता माने यांना देण्यात आला. पाणीपुरवठा योजनांची २८ कामे मंजूर असून त्याच्या प्रशासकीय मान्यता आणि वर्क ऑर्डर का न दिल्याने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि नगर अभियंता सारिका आकुलवार यांना दोघांना नोटीस देऊन कारवाई करा, अशी सूचनाही त्यांनी केली.

### कुणी काय उपस्थित केले प्रश्न



**▶▶आमदार सुभाष देशमुख :** मंद्रुप ट्रामा सेंटरच्या साहित्य खरेदीसाठी निधी मिळावा, समांतर जलवाहिनीद्वारे पाणी मिळणार आहे हे पाणी साठवण करण्यासाठी व दोन दिवसाआड पाणी द्यावे, सिद्धेश्वर वनविहारास निधी द्यावा, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दूध वाढ योजनेच्या संदर्भात जनजागृती मोहीम सुरू करावी. औज बंधारा परिसरातील शेतकऱ्यांना वीज वापरण्यासाठी जादा वेळ वाढवून द्यावा.



**▶▶आमदार सचिन कल्याणशेट्टी**

अक्कलकोट परिसरात एमएसइबीचे ठेकेदार विविध योजनेच्या कामांसाठी शेतकऱ्यांकडून पैसे उकळत आहेत. याची चौकशी करा. नाले गटार सफाईसाठी मोहीम अजून सुरू झाली नाही,यासाठी रोबोट आणला असला तरी देखील अजून काम सुरू का झाले नाही?



**▶▶खासदार धैर्यशील मोहिते पाटील**

वर्ग खोल्या, पाणी मागणी, रस्ते यबद्दल प्रश्न उपस्थित करून लक्ष वेधले. उजनीमध्ये जल पर्यटन केंद्र करावे. यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करावा.



**▶▶आमदार देवेंद्र कोठे**

सिद्धेश्वर तलावात मासे व कासव दूषित पाण्यामुळे मरत आहेत. दूषित पाणी सोडणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे तसेच सोलापूर शहर परिसरात कचरा नियोजन चुकीचे ठरत आहे. कचरा संकलन विभागात अनेक अडचणी असल्याने त्रास सहन करावा लागत आहे.



**▶▶आमदार राजू खरे**

मोहोळ तालुक्यातील शेतकरी सीना नदीला जास्त दाबाने पाणी यावे, घरकुल लाभार्थ्यांना जागा मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

### दादा व ताईमध्ये विमान सेवेवरून शाब्दीक चकमक

खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर मुंबई व पुणे विमानसेवा सुरू करण्याऐवजी सोलापूर ते गोवा सुरू का केली असा प्रश्न उपस्थित केला. आमदार कल्याणशेट्टी यांनी गोव्याला विमानसेवा सुरू झाली तर तुम्हाला काय अडचण आहे असे म्हणाले. या वाक्यानंतर दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. शेवटी पालकमंत्री गोरे यांनी मध्यस्थी करत केल्याने विमान अजून उडायचे आहे त्यावेळी बघू असे ते म्हणाले.

### खा.शिंदेच्या विधानावर पालकमंत्र्यांची नाराजी

खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रत्येक गावा गावात ५० ते ६० वर्षपासून घरे बांधून राहत आहेत ते शासकीय जागेवर राहत असून आता घरकुल बांधण्यासाठी ती घरे न पाडता नियमित करा अशी मागणी केली मात्र सर्वोच न्यायालयाने अतिक्रमण काढा असे सांगितले असून तुम्ही आता कोणते मार्केटिंग करणार असे म्हणल्यानंतर गोरे यांनी मी तुमचा आदर करतो. मात्र मार्केटिंग हा शब्द मागे घ्या असे म्हणत नाराजी व्यक्त केली.

### दोघांच्या अभिनंदनाचा ठराव


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्यातील विविध विकास कामाला त्वरित मान्यता देऊन रखडलेल्या विकास कामे पूर्ण होण्यासाठी निधीची तरतूद केल्याने आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अभिनंदन ठराव केला असून याला सर्व उपस्थित आमदारांनी सहमती दिली.

## सोलापूर शहरात पावसाळी हवामान

✔ **सोलापूर** : सोलापूर शहरात आणि जिल्ह्यात गुरुवारी रात्री पडलेल्या पावसामुळे तापमानात घट झाली आहे. शुक्रवारी दुपारी २.३० नंतर शहरात पुन्हा पावसाळी हवामान तयार झाले. शहराच्या पूर्व आणि दक्षिण दिशेल काळसर ढग आले होते. अधूनमधून ढगांचा गडगडात झाला. मोठ्या पावसाची शक्यता होती. मात्र पावसाने हुलकावणी दिली. पावसाळी वातावरणामुळे जिल्ह्यावासियांना दिलासा मिळावा.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



थांबा, ते नव्याने प्रभाग रचना करणार आहेत!

संगम श्री डे
790-62-345

संगम श्री नाईट
336-29-225

कल्याण
389-08-468

मुंबई
330-61-227

# रामराजेंच्या घरी अचानक धडकला पोलिसांचा फौजफाटा

## उडाली खळबळ, आरोपांचा इन्कार, पण उत्तरे देता देता फुटला घाम

- 'त्या' महिलेच्या प्रकरणात साडेचार तास कसून चौकशी
- नाईक-निंबाळकरांचा नोंदविला जबाब
- 'तो मी नव्हेच' हे दाखविण्याचा घाट
- पोलिसांच्या पुढील कारवाईकडे लक्ष

✔ फलटण-सोलापूर/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या फलटणमधील निवासस्थानी शुक्रवारी (ता.१६) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास वडूज पोलीस ठाण्याकडील पोलिसांचा मोठा फौजफाटा अचानक धडकला. याने निवासस्थानात खळ् झालं. यासंबंधीची वार्ता वाऱ्यासारखी त्यांच्या फलटणसह सातारा जिल्ह्यातील समर्थकांमध्ये पोहचली. तसे समर्थक फलटणमधील त्यांच्या 'लक्ष्मी'या निवासस्थानी पोचले. मात्र निवासस्थानात कोणालाच प्रवेश दिला गेला नाही. सकाळी साडेदहा वाजता चौकशीसाठी पोहचलेले पोलीस दुपारी चार वाजता त्यांच्या निवासस्थानातून बाहेर पडले. तोपर्यंत सर्वत्र खळबळ माजली होती. सर्वत्र एकच चर्चा होती... आता पुढे काय होणार?



फलटण-रामराजे निंबाळकर यांचे लक्ष्मी निवासस्थाना चौकशीसाठी प्रवेश करताना पोलीस.

**रामराजे म्हणाले,**

### फक्त राजकीय संबंधातून 'त्या' महिलेशी संवाद



मंत्री जयकुमार गोरेंच्या बदनामीचे षडयंत्र वगैरे रचण्यात माझा अजिबात संबंध नव्हता आणि नाही. संबंधित महिलेस आपण ओळखतो. राजकीय संबंधातून तिच्याशी संवाद साधत होतो, तिला नोकरी लावण्यासाठीचे बोलणे झाले होते, असे रामराजे यांनी तपासादरम्यान पोलिसांना सांगितले. 'त्या' महिलेस पैसे देऊन आपण बदनामी करण्याबद्दल सांगितले नव्हते, असेही स्पष्टीकरण रामराजेंनी दिले आहे. तीन पानांचा जबाब पोलिसांनी नोंदवला आहे. यामध्ये हा उल्लेख नमूद असल्याचे वडूज पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून दैनिक 'सुराज्य'ला सांगण्यात आले.

दरम्यान रामराजे निंबाळकर यांना पोलिसांनी 'त्या' महिलेच्या संदर्भात काही प्रश्न विचारले. तेव्हा बुजुर्ग रामराजेंनी 'तो मी नव्हेच' अशी भूमिका वठविण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत केला. त्यांनी सर्व आरोपांचा इन्कार केला. पण उत्तरे देता देता त्यांना घाम फुटला, असे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला. याप्रकरणात आता पोलीस पुढची कोणती कारवाई करणार? याकडे सातारा अन् सोलापूर जिल्ह्यासह उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या बदनामी प्रकरणात रामराजे निंबाळकर यांचे नाव पोलीस तपासातून समोर आले होते.याप्रकरणात वडूज पोलिसांनी रामराजेंना काही दिवसांपूर्वी समन्स पाठवले होते. वडूज पोलीस ठाण्यात चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रकृती ठीक नसल्याचे कारण देऊन रामराजेंनी वडूज पोलीस ठाण्यात नकार दर्शवला होता. मुंबईत येऊन स्टेटमेंट घेण्याबद्दल सांगितले होते.

मात्र, वडूज पोलिसांनी आज सकाळीच फलटण शहर गाठले. तिथे रामराजे निंबाळकर यांच्या निवास्थानात थेट धडक मारुन पुढे साडेचार तास रामराजे यांची चौकशी करुन जबाब नोंदविला. वडूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे यांच्यासह या पोलीस ठाण्याचे ९ कर्मचारी आणि स्थानिक फलटण पोलीस ठाण्याकडील २ अशा एकूण ११ कर्मचाऱ्यांचे पथक रामराजेंच्या चौकशीच्या मोहिमेवर शुक्रवारी होते.

**मंत्री गोरे म्हणाले,**

### माझ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात अडकले रामराजे



रामराजे यांच्या फलटणमधील निवासस्थानी पोलीस चौकशी धडकले त्यावेळी नामदार गोरे हे सोलापूर दौऱ्यावर होते. या दरम्यान त्यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, माझ्या बदनामी प्रकरणात अनेक गोष्टी समोर आल्या आहेत. मोठं षडयंत्र रचण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय द्वेष करण्याचा किती प्रयत्न करावेत, याचं हे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांनी अनेक राजकीय नेत्यांना संपवण्याचे काम केले आहे. तसेच, नव्या नेतृत्वाला संपविण्याचे काम त्यांनी केलेले आहे. माझ्याही पाठीशी गेली १७ वर्षांपासून हा संघर्ष होता. मी मंत्रिपदाची शपथ घेऊन काम सुरू केल्यानंतर त्यांनी कळस गाठला होता. पण, परिणाम आपण बघितला असेल. काही तरी षडयंत्र करायचं, त्यातून बदनाम करायचं आणि आपल्या विरोधकांना संपविण्याचा घाट त्यांनी घातला होता. अनेकदा असं होतं की जेव्हा आपण दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, तेव्हा आपल्यासाठी तो आपोआप तयार होतो. ती परिस्थिती आज निर्माण झाली आहे, असे सांगून माझ्यासाठी खणलेल्या खड्ड्यात रामराजे स्वतः अडकल्याचे सांगून गोरे यांनी आयुष्यभर शकुनीमामाचं काम केलं. आता परिस्थिती उलटी झालेली आहे. तसेच, सगळ्याच गोष्टी पुढे आलेल्या आहेत. त्या दोघांच्या (रामराजे आणि संबंधित महिला) संभाषणाचे कॉल रेकॉर्डिंग समोर आलेले आहे. त्यातून अनेक गोष्टी समोर आलेल्या आहेत. षडयंत्र समोर आलं आहे. कशा पद्धतीने प्लॅन होता, पैसे कोणाकडे पाठवायचे, कोणी द्यायचे, हे सर्व पुढे आलेले आहे. या सर्व तपासाच्या अनुषंगाने पोलिस रामराजेंच्या घरी गेलेले असावेत, असा दावाही जयकुमार गोरे यांनी केला. अप्रत्यक्षपणे सांगितले.